DAY — **03** SEAT NUMBER | | | | | | |

| 2011 | II | 24 | 1100 | J - 505 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# MARATHI (02)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 80

**प्र. १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा :** [१०]

(१) संगणक आपला मित्र

(२) स्त्री पुरुष समानता — काळाची गरज

(३) निसर्ग — एक कलावंत

(४) मृत्यू नसता तर ........

(५) दुष्काळग्रस्ताचे मनोगत

**प्र. २. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा :** [८]

(१) केरूनानांनी स्वत:च्या आणि घरच्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना केली?

(२) लेखकाने छत्रपती शाहू महाराजांना 'आभाळाएवढा छत्रपती' असे का म्हटले आहे ते स्पष्ट करा.

(३) लेखिका रजिया पटेल यांच्या वडिलांनी गावच्या विकासासाठी कोणते कार्य केले?

**प्र. ३. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा :** [८]

(१) 'डुलकेलेल्या बाळकाचा दृष्टांत' मधील दृष्टांतकथा तुमच्या भाषेत लिहा.

(२) 'ट्रॉयचा घोडा' या शीर्षकाचा अर्थ स्पष्ट करा.

(३) फ्रान्सिस दिब्रिटो यांना फ्रान्समधील वाढदिवसाच्या पार्टीच्या वेळी कोणता अनुभव आला?

(४) डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या आईला 'अदृश्य ऐंजिन' असे का म्हटले आहे?

**प्र. ४. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा :** [८]

(१) सागराबद्दल स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची कोणती तक्रार आहे? का?

(२) 'श्रीरंग' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

(३) पुलाच्या कठड्यावर बसलेल्या मुलीला पाहून कवयित्रीला कोणकोणते प्रश्न पडतात?

प्र. ५. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा : [४]

(१) संत नामदेवांनी कृष्णाच्या कोणकोणत्या बाललीलांचे वर्णन केले आहे?

(२) शाहीर राम जोशी यांनी भक्तीचे बाह्य प्रदर्शन करणाऱ्यांचे वर्णन कसे केले आहे?

(३) कवी दासू वैद्य यांना लहान मुलांच्या वृत्तीतील कोणता बदल भीतिदायक वाटतो?

प्र. ६. (क) खालीलपैकी कोणत्याही एका गद्य वाक्यातील आशयसौंदर्य स्पष्ट करा : (४) [१२]

(१) "तुमचे मनांत गुबार होता तो तुम्हीं बाहेर काढला."

(२) या मातीतल्या नारींचा जन्म होतो तो या निष्ठा घेऊनच.

(३) "माफी करा ......... तात्यासाब, माफी करा ........"

(ख) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा : (४)

(१) धुळि आंतिल रत्न। जरि भेटे न करितां प्रेत्न।
तरि चतुरिं यत्न। कां न करावा॥

(२) जरी त्याचेच अपत्य। हिरोशिमा॥

(३) येथूनच आहे नव्या स्वप्नांची सुरुवात.

(ग) (i) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (२)

(१) फोंड सावंताने कोणता डोंगर बांधावयास जमाव पाठवला होता?

(२) तानू कोणत्या शाहिराची लावणी म्हणत होता?

(३) 'ट्रॉय' या शहरावर कोणी हल्ला केला होता?

(४) विनायक पांडुरंग करमरकर यांचे वास्तव्य कोठे होते?

(ii) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (२)

(१) कवी अनिल नादात चालताना काय करीत असत?

(२) कवीला कशाचा दिवाणा भास होतो?

(३) 'भुंड टेकाड' ही कविता कोणत्या कवीने लिहिली आहे?

(४) झाडे माणसाला कशाचे थोरपण सांगतात?

प्र. ७. (क) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १०० शब्दांत लिहा : (६) [१०]

(१) 'दारिद्र्यात स्वाभिमानाला जास्त तीक्ष्ण धार असते' हे लेखिकेने कशा प्रकारे स्पष्ट केले आहे?

(२) नर्मदा व तिचे पती यांच्यात कोणत्या गोष्टींबद्दल मतभेद होते?

(३) चंद्रकला सरपंच होऊ नये यासाठी तिच्या नवऱ्याने कोणकोणती कारस्थाने केली?

(ख) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ६० शब्दांत लिहा : (४)

(१) स्वैपाकाच्या बाईची राजा कुत्र्याशी कशा प्रकारची वागणूक होती?

(२) शिकवणी वर्गातून बाहेर पडणारी मुले पाहून पिराजीच्या मनात कोणते विचार आले?

(३) कथानायिकेने बुवाला ब्रह्मचर्याबद्दल कोणता विचार ऐकविला?

प्र. ८. (क) खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा : (२) [१०]

(१) व्यतिरेक (२) श्लेष

(ख) कंसातील सूचनेनुसार कोणत्याही दोन वाक्यांचे रूपांतर करा : (२)

(१) सर्जनाच्या लीलेला मिळणारे पहिले आव्हान फुलांचे असते.
(मिश्र वाक्य करा.)

(२) मनात येते तर त्यांना वाटेल ते होता आले असते.
(केवल वाक्य करा.)

(३) ते ओल्या वाळूचा खोपा करतात आणि घर-घर खेळतात.
(वाक्यप्रकार ओळखा.)

(ग) खालीलपैकी कोणत्याही चार पारिभाषिक शब्दांचे अर्थ लिहा : (२)

(१) Accountant (२) Basic Pay
(३) Charge (४) Elected
(५) Gate-Pass (६) Training

(घ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार शुद्ध करून लिहा : (२)

(१) सुगंधाचा हा ग्लीष्ठपणा थंडीच्या दिवसांत फार फार जाणवतो.

(२) जग ही बंदिशाळा नमून अनुभवांचि ती कार्यशाळा आहे.

किंवा

खालीलपैकी कोणत्याही एका वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा :

(१) मग ह्या यानाचा नाश कसा करायचा

(२) ''नतद्रष्ट! कृतघ्न ब्लॅकमेल करता तुम्ही मला''

(च) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वतःच्या वाक्यांत उपयोग करा : (२)

(१) आकाश कोसळणे. (२) प्रतिसाद देणे.
(३) पदरात पाडून घेणे. (४) तंबी देणे.

प्र. ९. (क) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा : (४) [१०]

(१) 'साथीच्या रोगांत घ्यावयाची दक्षता' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांस विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आमंत्रित करणारे पत्र लिहा.

(२) महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी सेठ प्रकाशन, नागपूर यांना पुस्तकांची मागणी करणारे पत्र ग्रंथपाल या नात्याने लिहा.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :** (३)

नागपंचमी गेली की बैलपोळा यायचा. पोळ्याच्या दिवशी बैल रंगवले जायचे. गळ्यात घालायच्या घुंगरांच्या माळा, शिंगाला लावायचे भरजरी गोंडे, रंगीबेरंगी झुली हा सगळा साज त्यांच्या अंगावरती चढवला जायचा. हिरव्या चाऱ्याने धष्टपुष्ट झालेली ती जनावरे त्या दिवशी सजवलेल्या नवरदेवासारखी दिसायची. बैलांची पूजा घरातील मालकीण करायची. नवं लुगडं, नाकात नथ, अंगावर एखादा दागिना अशी तीही सजायची. हळद-कुंकू लावून बैलांचे पाय धुवायचे. त्यांना पुरणाच्या पोळ्यांचा नैवेद्य खाऊ घालायचा आणि मगच घरचा मालक, लहानमोठी मुलं, शेतावर काम करणारे गडीगुडी एका पंक्तीत बसून जेवायचे. ज्यांच्या श्रमावर आपली शेती चालते, आपला पोटप्रपंच चालतो त्या बैलांचा हा मानसन्मान. शेतीप्रधान संस्कृतीचं असं हे रूप मन मोहून टाकणारं आहे.

'सहवास'

श्री. यशवंतराव गडाख

**प्रश्न :**

(१) पोळ्याच्या सणाला बैलांना कसे सजविले जात असे? (१)

(२) बैलांची पूजा कशा प्रकारे केली जात असे? (१)

(३) पोळ्याच्या सणाला बैलांचा मानसन्मान का केला जात असे? (१)

**किंवा**

**वरील गद्य उताऱ्याचा सुमारे एक तृतीयांश ($\frac{१}{३}$) एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**(ग) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निमंत्रणपत्रिका लिहा :** (३)

(१) तुमच्या महाविद्यालयातील 'मराठी वाङ्मय मंडळा'चे उद्घाटन.

(२) तुमच्या महाविद्यालयाचा वार्षिक बक्षीस समारंभ.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कार्यक्रमपत्रिका तयार करा :**

(१) शाळेच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ.

(२) तुमच्या महाविद्यालयात होणारा वृक्षारोपण समारंभ.

**किंवा**

**खालील विषयावर वर्तमानपत्रासाठी वृत्तान्त लिहा :**

तुमच्या महाविद्यालयात झालेले 'व्यायामाचे महत्त्व' या विषयावरील व्याख्यान.

◆◆◆